**<u>रे.मु.नं.२१४/२०१९ मधील निशाणी क्रमांक ३६ वरील आदेश</u>**
**<u>(संगिता सुदाम शिंदे विरुध्द रंगनाथ तुकाराम आढाव व इतर)</u>**

१. वादीतर्फे प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.३८ वर चौकशी होईपावेतो प्रतिवादी क्र१, ३, ५, ६ व १० ते १२ यांनी दावा मिळकतीबाबत जैसे थे परिस्थिती ठेवण्याचा आदेश मिळावा यासाठी दिला आहे.

२. सदरील अर्जावर विरुध्द पक्षकारांचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादींनी सदरील अर्जावर सविस्तर म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विंनती केली आहे.

३. दोन्ही विधिज्ञांचा प्रर्दिघ युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे व प्रस्तुत अर्जाचे अवलोकन करता असे दिसते की, वादींनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींविरुध्द वाटप, कब्जा व जाहिर ठराव मिळण्यासाठी केला आहे. तसेच त्यात निशाणी क्र.३८ वर दाव्याचा निकाल लागेपर्यंत दावा मिळकत ही हस्तांतरीत करु नये याकरिता दाखल केला आहे. दाव्यात केलेली वंशावळ पाहता दावा मिळकतीत वादींचा देखील हिस्सा आहे असे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे दरम्यान प्रतिवादींनी दावा मिळकत विक्री केल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच वादींचा दावाही निरर्थक ठरेल. याउलट प्रतिवादींनी निशाणी

क्र.३८ वर चौकशी होईपावेतो दावा मिळकतीच्या मालकीबाबत जैसे थे परिस्थिती ठेवण्याचा आदेश पारित केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे योग्य न्यायाच्या दृष्टीकोनातून दावा मिळकतीच्या मालकीबाबत जैसे थे परिस्थिती ठेवण्याचा आदेश निशाणी क्र.३८ वर प्रतिवादी क्र.१, ३, ५, ६ व १० ते १२ यांनी चौकशी होईपावेतो ठेवावे असा आदेश पारित करणे योग्य वाटते. म्हणून मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करते.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी व प्रतिवादी क्र.१, ३, ५, ६ व १० ते १२ दावा मिळकतीच्या मालकीबाबत आहे ती परिस्थिती प्रतिवादी क्र.१, ३, ५, ६ व १० ते १२ यांनी निशाणी क्र.३८ वर चौकशी होईपावेतो कायम ठेवावी. दोन्ही पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Swati Ganpat Jadhav
Date: 2021.02.05 15:43:52 +0000

**(श्रीमती एस. जी. जाधव)**
२ रे सह दिवाशी न्यायाधीश, क.स्तर,
श्रीगोंदा, जि.अहमदनगर.

दिनांक ०५/०२/२०२१.
श्रीगोंदा.